Estd : 1962
'A'' Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ६३ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यांसाठी निवेदन

- विद्यापीठाच्या ६३व्या दीक्षांत समारंभासाठी ऑक्टोबर २०२५ व मार्च २०२६ सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी, पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन (Online) अर्ज खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कालावधी | प्रत्यक्ष उपस्थित (In Presence) विहीत शुल्क | पोस्टाव्दारे (ByPost) विहीत शुल्क |
|---|---|---|---|
| १) | दि. ०१ जुलै २०२६ ते दि. ३१ जुलै २०२६ पर्यत | रु. ५००/- | रु.६००/- |
| २) | दि. ०१ ऑगस्ट २०२६ ते दि. १५ ऑगस्ट २०२६ पर्यत | रु. ७००/- | रु. ८००/- |
| ३) | दि. १६ ऑगस्ट २०२६ ते दि. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यत | रु. १७००/- | रु. १८००/- |
| दीक्षांत अर्ज मुदतीनंतर पीएच.डी प्राप्त विद्यार्थ्याचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज, दि. १० सप्टेंबर २०२६ पर्यत स्वीकारले जातील. (अंतिम शुल्क रु.१७००/- किंवा रु. १८००/- नुसार) | | | |

- पदवी प्रमाणपत्र मागणीचा अर्ज www.unishivaji.ac.in/Web Apps (Regular Convocation) या संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरावा लागेल. ऑनलाईन अर्ज भरताना प्रथम संकेतस्थळावरील सर्व सूचना वाचाव्यात व आवश्यक ती माहिती सोबत ठेवावी.
- विद्यार्थ्यांनी यापूर्वी पदवी प्रमाणपत्र घेतले नसलेची खात्री करावी व त्यानंतरच अर्ज भरावा. अन्यथा अशा विद्यार्थ्याचे शुल्क परत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार नाही.
- ऑनलाईन अर्ज करताना अर्जावरील माहिती बरोबर आहे की नाही याची खातरजमा करावी. जर विद्यार्थ्याच्या इंग्रजीमधील नावात किंवा अन्य काही दुरुस्ती असल्यास प्रथम संबंधीत स्वायत्त महाविद्यालय अथवा संबंधीत परीक्षा विभाग यांचेशी संपर्क साधावा व आवश्यक ती दुरुस्ती करुन माहिती अपडेट करुनच पदवी प्रमाणपत्राकरीता संबंधित ऑप्शनमधून अर्ज भरावा. तसेच विद्यार्थ्याने मराठी मधील आपले पुर्ण नाव व आईचे नाव बिनचूक नमुद करावे.
- विद्यापीठ अधिकार मंडळाचे ठरावानुसार तीन वर्षीय विधी व पाच वर्षीय विधी अभ्यासक्रमातील फक्त अंतिम वर्षाचे पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. त्यानुसार विद्यार्थ्यांनी फक्त अंतिम वर्षासाठी ऑनलाईन अर्ज भरावा.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार, सन २०२१-२०२२ पासून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना ABC ID काढून विद्यापीठ संगणक प्रणालीमध्ये त्याची नोंद करणे आवश्यक आहे. सबब ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप ABC ID ची नोंद केलेली नाही, त्यांनी ABC ID create करुन त्याची संगणक प्रणालीमध्ये नोंद करुन नंतरच पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरावा.
- एका पदवी प्रमाणपत्र अर्जासाठी एकच ई मेल आयडी वापरावा.
- सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत स्वत:च्या माहितीसाठी जपून ठेवावी. विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंट विद्यापीठात जमा करण्याची आवश्यकता नाही.
- ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरला आहे व शुल्काबाबतची कार्यवाही केली आहे. परंतु विद्यापीठाची पावती तयार झालेली नाही अशा विद्यार्थ्यांनी ३१ ऑगस्ट २०२६ पुर्वी विद्यापीठाच्या आय टी सेल विभागाशी (०२३१-२६०९३३५) संपर्क साधावा. अन्यथा आपला अर्ज संगणक प्रणली मध्ये समाविष्ट होणार नाही याची नोंद घ्यावी.
- २००२ पासून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी रेग्युलर (Option) मधून फॉर्म भरण्यात यावा. तसेच २००२ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थ्याचा फॉर्म Regular ऑप्शनमधून भरला जात नाही, त्या विद्यार्थानी फॉर्म भरण्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रांसहीत प्रत्यक्ष दीक्षांत विभागामध्ये संपर्क्र साधावा. (अंतीम वर्षाचे मार्कलिस्टची झेरॉक्स, स्वत:चा आयकार्ड साईज फोटोच्या दोन प्रती व फोटोशी साम्य असलेले स्वत:चे आयडेंटीटी प्रुफ झेरॉक्स, आईचे नावासंदर्भात आवश्यक कागदपत्रे उदा. आईचे आधारकार्ड, वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी Internship completion Certificate of University प्रत आणणे आवश्यक आहे.) तसेच ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठात येणे शक्य नसेल त्या विद्यार्थ्यांनी दीक्षांत विभागाशी संपर्क साधावा. (फोन नं.०२३१-२६०९११३/२६०९३०२ व ईमेल -convocation@unishivaji.ac.in )
- अर्ज ऑनलाईन भरताना जे विद्यार्थी २००६ पूर्वी उत्तीर्ण आहेत अथवा ज्या विद्यार्थ्याचे फोटो ऑनलाईन दिसत नाहीत त्यांनी स्वत:च्या फोटोची JPEG image (20 kb) अपलोड करुन अर्ज ऑनलाईन भरावा.
- अर्ज भरताना विद्यार्थ्याचा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे.
- दीक्षांत समारंभाची तपशिलवार माहिती विद्यापीठाच्या संकेत स्थळावर ठेवण्यात येईल तसेच विद्यार्थ्यांना SMS व्दारे कळविण्यात येईल.
- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेनंतर व शुल्काची कार्यवाही केलेनंतर संगणक प्रणालीमधून पावती तयार होण्याची ६० मिनिटे वाट पाहणे आवश्यक आहे. जर पावती वेळेत तयार झाली नसेल तर पुन:श्च शुल्काबाबतची कार्यवाही न करता दीक्षांत विभागाशी तात्काळ संपर्क साधावा.
- वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत विद्यापीठाचे Internship Complition Certificate of University प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.
- ज्या परीक्षांचा निकाल Viva-Voce, Dessertation नंतर जाहीर करण्यात येतात, त्या परीक्षांचे अंतिम गुणतक्ता अपलोड करणे आवश्यक आहे..(उदा.M.E./M. Tech/M.Text/M.Arch./M.Pharmacy/M.Phil/Ph.D etc.)
- M.Phil/Ph.D उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये Viva-Voce Date करावी, निकाल जाहीर झालेल्या पत्राची तारीख नमुद करु नये. ऑनलाईन अर्जासोबत Ph.D Declaration letter अपलोड करावे.
- श्रेणीसुधारणा परीक्षेस बसून ज्यांच्या निकालात श्रेणीसुधारणा झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मागणी अर्जासोबत पूर्वीचे मूळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठास परत करणे आवश्यक आहे अशा विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह दीक्षांत विभागास समक्ष संपर्क साधावा. फक्त गुणांमध्ये बदल झाला असेल व श्रेणी सुधारणा झाली नसेल तर त्या विद्यार्थ्यांनी अर्ज करु नये. अशा विद्यार्थ्यांनी पुर्वीचे पदवी प्रमाणपत्र घेतले नसेल तर त्यांनी पुर्वीच्याच गुणतक्त्यानुसार पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज करावा.
- अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी आपला पूर्ण पत्ता, पिनकोडसहीत बिनचूक लिहावा/ऑनलाईन भरावा. चुकीचा पत्ता दिल्यास पत्रव्यवहार/पदवी प्रमाणपत्र पोहचू शकले नाही तर विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.
- दीक्षांत समारंभापूर्वी पदवी प्रमाणपत्र पात्र विद्यार्थ्याची यादी व इतर अनुषंगिक सूचना विद्यापीठाच्या वेबसाईटवर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.
- पदवी प्रमाणपत्राबाबत तक्रार किंवा दुरुस्ती असल्यास, विद्यार्थ्याने त्याच्या Login मधील Grievance मध्ये ती नोंदवावी.
- ज्या विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभानंतर विहित सर्व प्रक्रीया पुर्ण केलेनंतरही पदवीप्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्यास, त्या विद्यार्थ्यांनी, दीक्षांत विभागास समारंभानंतर तीन महिन्यापर्यंतच संपर्क साधावा. त्यानंतर कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करताना काळजीपूर्वक In Person/In Absentia पैकी योग्य तो ऑप्शन (Option) निवडावा. त्यामध्ये नंतर कोणताही बदल केला जाणार नाही.
- ऑनलाईन अर्ज करताना काही अडचणी उदभवल्यास खालील दुरध्वनी क्रमांकाशी संपर्क साधावा
- १) ऑनलाईन अर्जाबाबतीत तांत्रिक अडचणीबाबत संपर्क क्रमांक -आय.टी.सेल ०२३१-२६०९३३५
- २)दीक्षांत विभाग - ०२३१-२६०९११३ /०२३१-२६०९३०२.

**दीक्षांत विभाग**
**दि. २८/०६/२०२५**

**डॉ. अजितसिंह एन. जाधव**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**